**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९९/२०१९** **दिनांक १०/१२/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०४/१२/२०१९ ते १०/१२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ११/१२/२०१९ सकाळी ८:३० पासून १५/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४/१२ | ०५/१२ | ०६/१२ | ०७/१२ | ०८/१२ | ०९/१२ | १०/१२ | | ११/१२ | १२/१२ | १३/१२ | १४/१२ | १५/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.० | ३३.४ | ३१.० | ३३.० | ३२.० | ३३.० | - | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३४ |
| २३.० | २४.५ | २४.४ | २०.४ | २३० | २१.६ | - | किमान तापमान (अं.से) | २३ | २२ | २१ | २१ | २१ |
| ० | २ | २ | ० | ० | ० | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ५ | ४ | ४ | ६ | ४ |
| ८३ | ८४ | ६८ | ८३ | ८४ | ८३ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७७ | ७८ | ८१ | ७५ | ६७ |
| ४३ | ६१ | ४४ | ५० | ४८ | ३८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५० | ४४ | ४७ | ४५ | ४० |
| २.१ | १.९ | २.० | ३.६ | २.७ | १.१ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ५ | ५ | ७ | ६ |
| ई.ऊ. | वा.ऊ. | आ.पू. | वा.प. | शांत | शांत | - | वाऱ्याची दिशा | पु. | पु. | इ.पू. | इ.पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ४२३३.४ | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ११ ते १५ डिसेंबर, २०१९ दरम्यान तापमानात वाढ संभवत असून आकाश अंशत: ढगाळ राहील.**

**दिनांक १३ ते १९ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार पालघर जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **हरभरा** | **पेरणी** | • हरभरा लागवडीसाठी लहान दाण्यांच्या वाणाकरिता ६० ते ६५ किलो, मध्यम दाण्यांच्या वाणाकरिता ६५ ते ७० किलो आणि टपोऱ्या दाण्यांच्या वाणाकरिता १०० किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे. मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम थायरम अथवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रति किलो बियाणे चोळावे. यानंतर बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करुन बियाणे सावलीत सुकवून पेरणी करावी. पेरणी ३० x १० सें.मी. अंतरावर टोकण पद्धतीने करावी. पेरणीच्या वेळी ५४ किलो युरिया, ३१३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ५० किलो म्युरेट ऑफ पोटाश प्रति हेक्टरी द्यावे. |
| **आंबा** | **पालवी अवस्था** | • पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तीन ते चार वर्षे वयापर्यंतच्या माडाना ६ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच पूर्ण वाढलेल्या माडांना जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| **चिकू** | **फळधारणा** | • बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने चिकू बागेस ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• चिकूवर बी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे व पालापाचोळा गोळा करून नष्ट करावीत व बागेची स्वच्छता राखून बागेत पूरेसा सूर्यप्रकाश येईल असे पहावे. तसेच ५० टक्के प्रवाही प्रोफेनोफोस १५ मि. ली. किंवा १४.५ टक्के प्रवाही इंडोक्झाकार्ब ५ मि.ली किंवा २.८ टक्के प्रवाही डेल्टामेथ्रीन १० मि. ली. कीटकनाशक प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **वांगी** | **वाढीची अवस्था** | • वांगी, पिकामध्ये तुडतुडे, पांढरी माशी व मावा किडी पानांच्या खालच्या भागावर राहून पानांतील अन्नरस शोषून घेतात व त्यामुळे पाने पिवळी होतात. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा.<br>• वांगी पिकास प्रति एकरी क्षेत्रास ४३ किलो युरिया खताची मात्रा पुर्नलागवडीनंतर एका महिन्याने देण्यात यावी. |
| **मिरची** | **वाढीची अवस्था** | • मिरची पिकामध्ये तुडतुडे, पांढरी माशी व मावा किडी पानांच्या खालच्या भागावर राहून पानांतील अन्नरस शोषून घेतात व त्यामुळे पाने पिवळी होतात. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा. |
| **मोगरा** | **फुल** | • मोगरा पिकास खताची दुसरी मात्रा ५ ते १० किलो शेणखत, ६५ ग्रॅम युरिया, ३७५ ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १०० ग्रॅम |

| | | |
|---|---|---|
| | **अवस्था** | म्युरेट ऑफ पोटश प्रति झाड डिसेंबर महिन्यात देण्यात यावी.<br>• मोगरा पिकावर कळी पोखरणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, कोळी व कळ्या खाणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त पाने व कळ्या काढून नष्ट कराव्यात व गरजेनुसार ५ टक्के निबोळी अर्काची फवारणी करावी. |
| **दुभती जनावरे/शेळ्या** | **-** | • जनावरांवर गोचीडांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी गोठयाची स्वच्छता राखावी व पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली डेल्टामेथ्रीन २ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून संपूर्ण अंगावर द्रावण फवारावे. जनावरे औषध चाटणार नाही, याकरिता फवारणी पूर्वी जनावराला पाणी पाजावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**<br>**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |